**भारताच्या माननीय उपराष्ट्रपतींची श्रीलंकेला भेट (19-20 एप्रिल 2026)**

20 एप्रिल 2026

भारताचे माननीय उपराष्ट्रपती, श्री सी.पी. राधाकृष्णन यांनी 19 ते 20 एप्रिल 2026 दरम्यान श्रीलंकेला भेट दिली. त्यांच्यासोबत मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालय आणि पंचायती राज मंत्रालयाचे माननीय राज्यमंत्री प्रा. एस. पी. सिंग बघेल; आणि माननीय खासदार डॉ. के. लक्ष्मण आणि डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी उपस्थित होते. ही भारताच्या उपराष्ट्रपतींची श्रीलंकेसोबत झालेली आजवरची पहिलीच द्विपक्षीय भेट होती. यापूर्वी, ऑक्टोबर 2000 मध्ये, भारताचे तत्कालीन उपराष्ट्रपती श्री कृष्ण कांत यांनी श्रीलंकेच्या माजी पंतप्रधान श्रीमती सिरिमावो भंडारनायके यांच्या शासकीय इतमामात अंत्यसंस्कारासाठी श्रीलंकेला भेट दिली होती.

2. 19 एप्रिल रोजी, माननीय उपराष्ट्रपतींनी कोलंबो येथील राष्ट्रपती सचिवालयात श्रीलंकेचे राष्ट्रपती, महामहिम अनुरा कुमारा दिसनायके यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी सुरू असलेल्या द्विपक्षीय उपक्रमांचा आढावा घेतला, ज्यामध्ये श्रीलंकेत भारताद्वारे राबविल्या जाणाऱ्या विविध विकास सहकार्य प्रकल्पांच्या प्रगतीचाही समावेश होता. नोव्हेंबर-डिसेंबर 2025 मधील डिटवाह चक्रीवादळामुळे मोठे नुकसान झालेल्या उत्तर रेल्वे मार्गाचे पुनर्संचयनाचे काम पूर्ण झाल्यानंतर, तेथील रेल्वे सेवा पुन्हा सुरू झाल्याबद्दल दोन्ही नेत्यांनी आनंद व्यक्त केला. हे पुनर्संचयनाचे काम भारत सरकारकडून मिळालेल्या 5 दशलक्ष अमेरिकन डॉलर्सच्या अनुदानांतर्गत करण्यात आले. डिटवाह चक्रीवादळामुळे झालेल्या विध्वंसानंतर, अत्यंत महत्त्वाची रस्ते जोडणी पूर्ववत करणाऱ्या आणखी तीन बेली ब्रिजेसचे बांधकाम पूर्ण झाल्याबद्दल माननीय उपराष्ट्रपती आणि श्रीलंकेच्या राष्ट्रपतींनी आनंद व्यक्त केला. या भेटीच्या दरम्यानच पूर्ण झालेले हे बेली ब्रिजेस, डिटवाह चक्रीवादळानंतरच्या पुनर्बांधणी आणि पुनर्वसनासाठी भारताने दिलेल्या 450 दशलक्ष अमेरिकन डॉलर्सच्या सहाय्य पॅकेजचा भाग म्हणून भारतीय लष्कराने बांधले आहेत. भारताच्या नेतृत्वाखालील इंटरनॅशनल बिग कॅट अलायन्स मध्ये सामील होण्याचा निर्णय श्रीलंकेने घेतल्याबद्दल उपराष्ट्रपतींनी आनंद व्यक्त केला.

3. श्रीलंकेच्या माननीय पंतप्रधान डॉ. हरिणी अमरसूर्या यांनी माननीय उपराष्ट्रपतींच्या सन्मानार्थ स्नेहभोजनाचे आयोजन केले. दोन्ही नेत्यांनी भारत आणि श्रीलंका यांच्यातील सखोल सांस्कृतिक संबंधांवर आणि हे संबंध जिवंत ठेवणाऱ्या लोकांमधील उत्साही जनसंपर्कावर चर्चा केली. माननीय उपराष्ट्रपती आणि श्रीलंकेच्या पंतप्रधान, ज्या शिक्षण मंत्री देखील आहेत, यांनी सेलोन इस्टेट वर्कर्स एज्युकेशन ट्रस्ट (CEWET) शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत मदतीची व्याप्ती वाढवण्याबाबतच्या घोषणेबद्दल समाधान व्यक्त केले. शिष्यवृत्तीची संख्या 350 पासून 700 पर्यंत वाढविण्यात आली आहे आणि ए-लेव्हल विद्यार्थ्यांसाठी मासिक स्टायपेंड LKR 2500 आणि उच्च शिक्षण घेणाऱ्यांसाठी LKR 7500 पर्यंत वाढविण्यात आले आहे, ज्यामुळे इस्टेट कामगारांच्या मुलांना फायदा होईल.

4. माननीय उपराष्ट्रपतींनी 19 एप्रिल रोजी कोलंबोमध्ये विरोधी पक्षनेते श्री. सजित प्रेमदास यांची भेट घेण्याव्यतिरिक्त भारतीय वंशाच्या तमिळ आणि श्रीलंकन तमिळ राजकीय पक्षांच्या नेत्यांशी देखील संवाद साधला.

5. माननीय उपराष्ट्रपतींनी कोलंबो येथील न्यू कथिरेसन हॉलमध्ये आयोजित एका समुदाय स्वागत समारंभात सुमारे 1000 परदेशस्थ भारतीय नागरिकांना संबोधित केले. या कार्यक्रमात माननीय उपराष्ट्रपतींनी जाहीर केले की, श्रीलंकेतील भारतीय वंशाच्या तमिळ (IOTs) नागरिकांसाठी OCI कार्डची पात्रता आता 5व्या आणि 6व्या पिढीपर्यंत वाढवण्यात आली आहे. सध्याची ही अट केवळ 4थ्या पिढीपर्यंत मर्यादित होती. माननीय उपराष्ट्रपतींनी OCI प्रक्रियेचे सुलभीकरण करण्याची देखील घोषणा केली; यामध्ये आता मूळ रहिवासी असल्याचा पुरावा म्हणून श्रीलंका सरकारने जारी केलेल्या प्रमाणपत्रांना मान्यता दिली जाणार आहे. OCI कार्ड्स आता या दस्तऐवजांच्या आधारे जारी केले जातील, ज्यामध्ये श्रीलंका सरकारकडून जारी केलेली नोंदणी प्रमाणपत्रे, भारत-श्रीलंका पासपोर्ट, किंवा कोलंबो येथील भारताचे उच्चायुक्तालय आणि कँडी येथील भारताचे सहाय्यक उच्चायुक्तालय येथे राखून ठेवलेले नोंदणी अभिलेख यांचा समावेश आहे. ही श्रीलंकेतील परदेशस्थ भारतीयांची दीर्घकाळापासूनची मागणी होती आणि याचा फायदा IOTs, विशेषतः इस्टेट कामगारांना होईल. माननीय उपराष्ट्रपतींनी आभासी पद्धतीने 145 घरांच्या अंतिम संचाचे उद्घाटन करून ते लाभार्थ्यांना सुपूर्द केले. यासोबतच भारतीय गृहनिर्माण प्रकल्पाचा फेज-III पूर्ण झाला असून, याअंतर्गत प्लांटेशन इस्टेट कामगारांसाठी 4000 घरांचे बांधकाम करण्यात आले आहे. सुमारे ₹1835 कोटी (अंदाजे 62.75 अब्ज LKR) एकूण वचनबद्धता असलेला भारतीय गृहनिर्माण प्रकल्प हा श्रीलंकेतील एक प्रमुख अनुदान सहाय्य प्रकल्प असून, भारत सरकारद्वारे परदेशात हाती घेण्यात आलेला हा सर्वात मोठा प्रकल्प आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून, 50,000 घरांचे काम आधीच पूर्ण झाले असून, अन्य 10,000 घरांचे काम प्रगतीपथावर आहे.

6. माननीय उपराष्ट्रपतींनी कथिरेसन मंदिर आणि गंगारामय्या मंदिरालाही भेट देऊन दर्शन घेतले. फेब्रुवारी 2026 मध्ये गुजरातच्या देवनीमोरी येथील भगवान बुद्धांच्या पवित्र अस्थींचे या मंदिरात प्रदर्शनासाठी अनावरण करण्यात आले होते.

7. 20 एप्रिल रोजी, माननीय उपराष्ट्रपतींनी श्रीलंकेतील नुवारा एलिया जिल्ह्यातील रागाला येथील लिडल्सडेल इस्टेटमध्ये भारतीय गृहनिर्माण प्रकल्प अंतर्गत बांधण्यात आलेल्या घरांना भेट दिली. त्याठिकाणी, त्यांनी लाभार्थींच्या कुटुंबांशी संवाद साधला आणि IHP फेज-III अंतर्गत 166 घरांची बांधणी करण्यात आलेल्या गावात भेट दिली.

8. नुवारा एलिया येथे, माननीय उपराष्ट्रपतींनी सीता अम्मान मंदिरालाही भेट देऊन दर्शन घेतले. रामायणाशी संबंधित असलेल्या या महत्त्वपूर्ण स्थळी, माता सीतेला रावणाने अशोक वाटिकेमध्ये बंदी बनवून ठेवले होते, अशी धारणा आहे.

9. OCI कार्ड्सबाबतच्या घोषणा, भारतीय गृहनिर्माण प्रकल्पाच्या फेज-III ची पूर्तता, पूर्ववत केलेल्या उत्तर रेल्वे मार्गावरील रेल्वे सेवा पुन्हा सुरू करणे, 3 बेली ब्रिजेसची उभारणी आणि CEWET शिष्यवृत्तीचा विस्तार, तसेच श्रीलंकेचा भारताच्या नेतृत्वाखालील इंटरनॅशनल बिग कॅट अलायन्स मध्ये सामील होण्याचा निर्णय, या व्यतिरिक्त या भेटीदरम्यान खालील सामंजस्य करारांची देखील देवाणघेवाण करण्यात आली:

i. पूर्व प्रांतासाठी बहु-क्षेत्रीय अनुदान सहाय्य अंतर्गत सहा प्राधान्य प्रकल्पांच्या पहिल्या संचाबाबतचा सामंजस्य करार.

ii. मुल्लैतीवू येथील जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये चार मजली मेडिकल वॉर्ड कॉम्प्लेक्स बांधण्याबाबतचा सामंजस्य करार.

10. भारताच्या 'शेजारधर्म प्रथम' धोरण आणि व्हिजन महासागरमध्ये श्रीलंका प्रमुख भागीदार आहे. भारतीय उपराष्ट्रपतींची श्रीलंकेला दिलेली ही ऐतिहासिक पहिलीच द्विपक्षीय भेट, दोन्ही देशांमधील अलीकडच्या उच्च-स्तरीय संवादांच्या मालिकेतील पुढचे पाऊल आहे, यामुळे भारत आणि श्रीलंकेला एकत्र बांधून ठेवणाऱ्या शतकानुशतके जुन्या नागरिकांमधील परस्पर संबंधांना अधिक बळकटी मिळेल.

कोलंबो

20 एप्रिल 2026